महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ १६ मार्च २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २५८ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## घरकुल बांधणाऱ्यांना पाच ब्रास वाळू मोफत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आता राज्यात घरकुल बांधणाऱ्यांना मोफत वाळू मिळणार आहे. राज्यात घरकुल बांधणाऱ्या लाखो लोकांना याचा फायदा होणार आहे. घरकुल बांधणाऱ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, या निर्णयाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांनी केली आहे.राज्य सरकारच्या या निर्णयाचा फायदा होईल अशी आता नागरिकांमध्ये चर्चा रंगली आहे.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी लिलाव झालेले नाहीत. ज्या ठिकाणी आम्हाला एन्व्हायरमेंट क्लियरन्स मिळाला आहे. त्या ठिकाणी वाळू घाटांचं लिलाव होईल. तसेच घरकुलांना पाच ब्रास मोफत रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यासाठीही आम्ही तरतूद करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली. एकंदरीत जेवढी मागणी असेल, तेवढा पुरवठा असं वाळू धोरण आपण तयार करत आहोत. त्यासाठी एम सँड धोरण येत आहे. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टो क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्यामाध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल. कृत्रिम वाळूचा वापर अनिवार्य कृत्रिम वाळूचा वापर वाढावा, याकरिता यावर्षी (2025-26) शासकीय विभागांच्या बांधकामात किमान 20 टक्के कृत्रिम वाळूचा वापर करणे बंधनकारक राहणार आहे. त्यानंतर पुढील वर्षापासून मात्र शासकीय बांधकामात पूर्ण कृत्रिमवाळू वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. दरवर्षी वाळू उपशाबाबतचे वेळापत्रकही या धोरणात निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार वाळू गटाचे प्रस्ताव सादर करण्यापासून, सर्वेक्षण, तालुका समितीची बैठक, जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची बैठक, पर्यावरण सल्लागाराला प्रस्ताव पाठवणे, खाणकाम आराखडा, तांत्रिक अहवाल करणे गरजेचं आहे.

# बदलापूर - कर्जत रेल्वे प्रवास होणार सुखकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : केंद्र सरकारचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या 'पीएम गतिशक्ती' अंतर्गत 'नेटवर्क प्लॅनिंग गटा'च्या '89 व्या' बैठकीत राज्यातील बदलापूर-कर्जत रेल्वेमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाचा विस्तार व कार्यक्षमता सुधारण्याचा निर्णय घेण्यात आला. नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप (एनपीजी) च्या 89 व्या बैठकीत रस्ता, रेल्वे आणि मेट्रो क्षेत्रातील पायाभूत प्रकल्पांबाबत चर्चा झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) चे संयुक्त सचिव पंकज कुमार होते. या बैठकीत पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहत आराखडा (पीएमजीएस एनएमपी) च्या अनुषंगाने बहुपर्यायी कनेक्टीव्हिटी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारण्यावर भर देण्यात आला.

एनपीजीने आठ प्रकल्पांचे मूल्यमापन केले. त्यामध्ये चार रस्ते, तीन रेल्वे आणि एका मेट्रो प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे एकीकृत बहुआयामी पायाभूत सुविधा, सामाजिक आणि आर्थिक भागांच्या अखेरच्या टोकापर्यंत कनेक्टीव्हिटी आणि इंटरमोडल समन्वय या पीएम गतीशक्ती योजनेच्या तत्वांना अनुसरून हे मूल्यमापन करण्यात आले.

### रेल्वे मंत्रालय

1. बदलापूर-कर्जत रेल्वेमार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाचा विस्तार : 32.460 किमी लांबीच्या या ब्राउनफिल्ड प्रकल्पामुळे मुंबई-पुणे-सोलापूर-वाडी-चेन्नई मार्गावरील वाढत्या प्रवासी आणि माल वाहतुकीमुळे होणाऱ्या विलंबावर उपाय. बदलापूर, वांगणी, शेलू, नेरळ, भिवपुरी आणि कर्जत यांसारख्या प्रवाश्यांच्या आणि मालवाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणांच्या कनेक्टीव्हिटीमध्ये वाढ अपेक्षित आहे. हा पायाभूत प्रकल्प 'पीएमजीएस एनएमपी'च्या उद्दिष्टांशी सुसंगत असून, यामुळे विविध ठिकाणांदरम्यान जोडणी सुधारेल, कार्यक्षमतेत वाढ होईल आणि स्थानिक आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल.

2. नेरगुंडी ते कटक रेल्वेमार्गावर चौथ्या पदराचे बांधकाम आणि नेरगुंडी इथे उड्डाणपूल : 15.99 किमी लांबीचा हा ब्राउनफिल्ड प्रकल्प ओदिशातील रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यासाठी, मालवाहतुकीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण हा मार्ग पारादीप बंदर, तालचेर कोळसा खाणी, तसेच महत्त्वाच्या पोलाद आणि वीज उद्योगांसाठी फायदेशीर ठरेल.

3. हरिदासपूर ते पारादीप रेल्वेमार्गाचे दुपदरीकरण : 74.09 किमी लांबीच्या



या ब्राउनफिल्ड प्रकल्पामुळे ओदिशामध्ये मालवाहतुकीसह एकूणच वाहतुकीच्या कार्यक्षमतेत सुधारणा अपेक्षित. तालचेर कोळसा खाणींपासून पारादीप बंदरापर्यंत कोळशाची सुलभ अखंड वाहतूक अपेक्षित आणि अंगुल-झारसुगुडा औद्योगिक क्षेत्राचा वेगवान विकास.

### रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय

- मेघालय मध्ये दारुगिरी ते डालू विभाग दुपदरी रस्त्याचे पक्के बांधकाम
- ब्रह्मपुत्रा नदीच्या दोन बाजू जोडणारा गोहपूर ते नुमालीगढ चौपदरी बोगदा
- कालियाबोर ते नुमालीगढ रस्त्याचे चौपदरीकरण आणि सुधारणा
- मायजिलार ते जैसलमेर या दुपदरी रस्त्याचे बांधकाम आणि जैसलमेर बाह्यवळण रस्ता

### गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालय

राजकोट मेट्रो रेल्वे प्रकल्प

राजकोट मेट्रो रेल्वे प्रकल्प हा ग्रीनफिल्ड शहरी परिवहन उपक्रम राजकोट शहरात वाहतुकीची कोंडी कमी करणारा वाहतुकीचा पर्याय म्हणून महत्त्वपूर्ण. हे सर्व पायाभूत प्रकल्प पीएमजीएस एनएमपीच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत. यामुळे देशातील विविध ठिकाणांदरम्यान जोडणी सुधारेल, कार्यक्षमतेत वाढ होईल आणि स्थानिक तसेच राष्ट्रीय आर्थिक वाढीला चालना मिळेल.

# शंभर दिवसांच्या कृती आराखडयाची स्पर्धा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री अजित पवार यांनी शंभर दिवसांचा कृती आराखड्याबद्दल माहिती दिली आहे. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला. या कृती आराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील



सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थांकडून करवून घेऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने क्षेत्रीय स्तरावरील शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृति आराखडा निश्चित केला आहे. या आराखड्यामध्ये दिलेल्या मापदंडानुसार गुणांकन करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हास्तरावरील सर्व कार्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे स्पर्धेबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातून महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, भातकुली उपविभागीय अधिकारी मिन्नू पीएम, धारणी उपविभागीय अधिकारी प्रियंवदा म्हाडदडकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव आदी जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

सौरभ कटियार यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात केवळ चार विभागांसाठी असलेला कृती आराखडा संपूर्ण शासकीय यंत्रणेला लागू करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व कार्यालयांनी यात भाग घ्यावा. कार्यालयाच्या समस्या इतर विभागाच्या मदतीने सोडविण्यास मदत होत असल्यास निश्चितच मदत घ्यावी. प्रामुख्याने परिसर स्वच्छता, अभ्यागतांसाठी असलेली व्यवस्था, नागरिकांच्या समस्या सोडविणे आदी मानके ही कार्यालयीनस्तरावरील असल्याने यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# श्री छत्रपती शिवरायांच मंदीर उभारणार

## मराडपाडा गाव देशाच वैभव ठरेल - आमदार किसन कथोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

भिवंडी : भिवंडी तालुक्यात उभारण्यात येणारे मराडपाडा गांव देशातील वैभव ठरेल असे सांगत येथील राजेंद्र चौधरी व त्यांच्या संपूर्ण टीम चे कौतुक करत त्यांनी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिरातील गो पूजन व साधूसंतांच्या सत्करा प्रसंगी आपले विचार वेक्त करताना भावना वेक्त केली. यावेळी साधू संता च्या उपस्थित गो माता पूजन व प्रवेश सोहळा सपन्न झाला.

मला मराडे गावाचा सार्थ अभिमान आहे. असे सांगत आमदार किसन कथोरे यांनी या मंदिरामुळे येथील परिसर विकासकामातून पूर्ण बदलेल असा आशावाद वेक्त केला.

# ठाणे महापालिकेत ३३७ कोटींचा बेहिशेब

## आमदार संजय केळकर यांची चौकशीची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गेल्या पाच वर्षांपासून लेखापरीक्षण न करणाऱ्या ठाणे महापालिकेवर भाजपने 337 कोटींचा बॉम्बगोळा टाकला आहे. भाजपचे आमदार संजय केळकर यांनी या बॉम्बची वात पेटवली आहे. 2019-20 नंतर ठाणे महापालिकेने लेखापरीक्षणाचा अहवालच सादर न केल्याने 337 कोटी रुपयांचा हिशेबच लागत नाही, कोरोनासाठी किती रुपये खर्ची पडले याची माहितीही मिळत नाही, असा थेट आरोप आमदार संजय केळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन केला आहे. या बनवाबनवीची उच्चस्तरीय सखोल चौकशी करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांबरोबरच मिंधे गटाला हादरा बसला आहे. ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी 7 मार्च रोजी पालिकेचा अर्थसंकल्प सादर केला. यंदाचा






पालिकेचा अर्थसंकल्प तब्बल सहाशे कोटींनी फुगवण्यात आल्याने तो 5 हजार 645 कोटींवर जाऊन पोहोचला. तिजोरीत खडखडाट असतानाही केवळ आकडयांची चलाखी करून हा अर्थसंकल्प मांडण्यात आल्याने ठाणेकरांच्या पदरात मात्र काहीच पडले नाही. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या पाच वर्षांमध्ये महापालिकेच्या कारभाराचे लेखापरीक्षणच झालेले नाही. भाजपचे आमदार संजय केळकर यांनी हा गौप्यस्फोट करून प्रसारमाध्यमांशी बोलताना पालिका प्रशासनाचे अक्षरशः वाभाडे काढले. 2019-20 नंतर ठाणे पालिकेला कोरोनाचा निधी मिळाला. पण पालिकेने त्यानंतर लेखापरीक्षणाचा अहवालच सादर केला नाही. त्यामुळे कोरोनासाठी खर्ची पडलेल्या पैशांचा हिशेबच नाही. एवढेच नव्हे तर पालिकेकडे त्याची कोणतीही माहिती मिळत नाही. गेल्या पाच वर्षांत खर्च झालेल्या एकूण 337 कोटींचा हिशेबच लागत नाही, असा आरोप संजय केळकर यांनी केला. मिंधे गटाच्या तंबूत घबराट पालिकेतील कोट्यवधी रुपयांचा हिशेब लागेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार घेतल्याने मिंध्यांची चांगलीच गोची झाली आहे. आता भाजपनेच ठाणे पालिकेतील कोट्यवधी रुपयांच्या बेहिशेबी कारभाचा बॉम्ब पडल्याने पालिका अधिकाऱ्यांबरोबराच मिंधे गटाच्या तंबूतही घबराट पसरली आहे. मस्तवाल अधिकाऱ्यांना लूट करण्याची सूट आहे काय? भाजपचे आमदार संजय केळकर यांनी ठाणे पालिकेचा बेफिकीरपणा चव्हाट्यावर आणल्यानंतर जबाबदार अधिकाऱ्यांनाही धारेवर धरला आहे. 337 कोटी रुपये गेले कुठे? कोरोना निधीचे हिशेब काय, अशा असंख्य प्रश्नांची सरबत्ती कोटी रुपये गेले कुठे? कोरोना निधीचे हिशेब काय, अशा असंख्य प्रश्नांची सरबत्ती केली. मस्तवाल अधिकाऱ्यांना लूट करण्याची सूट आहे काय, असा सवालही त्यांनी केला. प्रशासनावर कोणाचाही अंकुश नाही. हे अधिकारी असेच मनमानीपणे वागत असतील तर अत्यंत गंभीर बाब असून या संपूर्ण घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करा, अशी मागणीही केळकर यांनी केली आहे. कोरोनाच्या निधीबरोबरच केंद्र सरकारकडून पालिकेला मोठे अर्थसहाय्य मिळाले. पण त्याचादेखील लेखाजोखा कोणाकडेच नसल्याने 337 कोटींचा हिशेब लागलेला नाही. आमदार केळकर यांनी आरोपाचा बॉम्ब टाकल्यानंतर पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# आता मुंबईत आयआयसीटीसाठी केंद्र सरकार देणार ४०० कोटी : देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : देशातील प्रतिष्ठित अशा आयआयटी संस्थेच्या धर्तीवर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) मुंबईच्या गोरेगावात उभारण्यात येईल व यासाठी केंद्र शासन ४०० कोटी रुपयांची आर्थिक मदत करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आयआयसीटी ही संस्था नावीन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानाच्या संगमातून भारताला जागतिक पातळीवर नेईल आणि संपूर्ण भारताच्या क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी क्षेत्रासाठी एक मैलाचा दगड व नवीन दिशा देणारे केंद्र ठरेल, अशा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. भारताच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदे (वेव्हज २०२५) च्या पहिल्या सत्राचे आयोजन सुषमा स्वराज भवन येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय व महाराष्ट्र शासनदरम्यान 'वेव्हज २०२५' निमित्त सामंजस्य करार झाला. आमच्याबद्दल मदत जागतिक स्तरावर होणाऱ्या या पहिल्या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र राज्याला मिळाले असून, राज्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींचेही त्यांनी आभार मानले.



यासंदर्भात फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या राजधानीत आणि देशाच्या आर्थिक केंद्र असलेल्या मुंबईमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' (आयआयसीटी) ची स्थापना केली जाईल.

या संस्थेच्या माध्यमातून मुंबईला जागतिक क्रिएटिव्ह हब बनवण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश असून याबाबत केंद्र शासन ४०० कोटी रुपयांची आर्थिक सहाय्यता देणार आहे. आयआयसीटी संस्था केवळ चित्रपट निर्मितीपुरती मर्यादित न राहता, डिजिटल कंटेंट, व्हीएफएक्स, ॲनिमेशन,ऑडिओ-व्हिज्युअल स्टोरीटेलिंग, मीडिया इनोव्हेशन आणि वेब ३.० तंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये संशोधन व प्रशिक्षण देण्यात येईल.

मुंबईतील आयआयटी मुंबई प्रमाणेच ही संस्था क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसाठी देशातील सर्वोत्तम केंद्र बनेल. मात्र या नव्या संस्थेमुळे भारताच्या क्रिएटिव्ह इंडस्ट्रीला जागतिक दर्जाचे व्यासपीठ मिळणार आहे.जसे दावोस आर्थिक क्षेत्रासाठी महत्त्वाचे आहे,तसेच हे व्यासपीठ क्रिएटिव्ह तंत्रज्ञान क्षेत्रासाठी जागतिक ब्रँड उभारणारे ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

### मुंबईत 'वेव्हज २०२५' परिषद

१ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईतील जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे 'वेव्हज २०२५' ही भव्य परिषद होणार आहे. या परिषदेसाठी १०० देश सहभागी होतील. या परिषदेमुळे नवीन तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण, धोरणे आणि गुंतवणुकीबाबत चर्चा होईल. ही परिषद ब्रॉडकास्टिंग, चित्रपट, ॲनिमेशन, गेमिंग, डिजिटल मीडिया, संगीत, जाहिरात, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि नवीन तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व्यावसायिकांसाठी मोठे व्यासपीठ ठरेल. यामुळे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणूक वाढण्यास मदत होईल, नवनवीन कल्पनांना चालना मिळेल आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत आपली उपस्थिती वाढवण्याची संधी मिळेल.

### मुंबई जागतिक मनोरंजनाचे केंद्र

मुंबई ही जशी भारताची आर्थिक राजधानी आहे तशीच ती मनोरंजन क्षेत्राची सुद्धा राजधानी आहे. महाराष्ट्र हा भारतीय सर्जनशील अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असून, चित्रपट, टेलिव्हिजन, डिजिटल कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रात मोठे योगदान देत आहे. मुंबईत दादासाहेब फाळके चित्रनगरी, फिल्मिस्तान स्टुडिओ, मेहबूब स्टुडिओ आणि फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यासारखी प्रतिष्ठित संस्थाने आहेत. याच पार्श्वभूमीवर 'वेव्हज २०२५' परिषदेचे आयोजन मुंबईत केले आहे.

या निमित्ताने मीडिया, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक क्षेत्रांना चालना मिळेल. सध्या जागतिक पातळीवरील माध्यम आणि मनोरंजन उद्योग झपाट्याने प्रगती करत असून, या क्षेत्राची बाजारपेठ वर्ष २०२४ पर्यंत २.९६ ट्रिलियन डॉलर्स होती.भारतात २०२९ पर्यंत ५० बिलियन डॉलर्स पर्यंत या क्षेत्राची वाढ अपेक्षित आहे. भारत सध्या ६० हून अधिक ओटीटी प्लॅटफॉर्मसह जागतिक स्तरावर वेगाने विस्तार करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



# गीतासार



**अध्याय ५**
**कर्मसंन्यासयोगः**

अर्जुन उवाच संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि । यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ ५-१ ॥

अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, तुम्ही कर्मे टाकण्याची आणि फिरून कर्मयोगाची प्रशंसा करता! तेव्हा या दोहोंपैकी माझ्यासाठी अगदी निश्चित कल्याणकारक जे एक साधन असेल, ते सांगा. ॥ ५-१ ॥

श्रीभगवानुवाच संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ ५-२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्हीही परम कल्याण करणारेच आहेत. परंतु या दोहोतही संन्यासाहून कर्मयोग साधण्यास सोपा असल्याने श्रेष्ठ आहे. ॥ ५-२ ॥

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति । निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥ ५-३ ॥

हे महाबाहो अर्जुना, जो मनुष्य कोणाचा द्वेष करीत नाही आणि कशाची अपेक्षा करीत नाही, तो कर्मयोगी नेहमीच संन्यासी समजावा. कारण राग-द्वेष इत्यादी द्वंद्वांनी रहित असलेला मनुष्य सुखाने संसारबंधनातून मुक्त होतो. ॥ ५-३ ॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः । एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥ ५-४ ॥

वर सांगितलेले संन्यास आणि कर्म योग वेगवेगळी फळे देणारे आहेत, असे मूर्ख लोक म्हणतात; पंडित नव्हेत. कारण दोहोंपैकी एकाच्या ठिकाणीसुद्धा उत्तम प्रकारे स्थित असलेला मनुष्य दोहोंचे फलस्वरूप असलेल्या परमात्म्याला प्राप्त होतो. ॥ ५-४ ॥

# श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदीर भिवंडीत

## मुख्यमंत्र्याच्या हस्ते सोमवारी लोकार्पण



छत्रपता शिवाजा महाराज, आपल दैवत . याच आपल्या दवताच एक भव्य मादर साकारण्यात आलय. भिवडा तालुक्याताल मराड पाडा यथ महाराजाच ह मादर गडकाट किल्ल्याप्रमाणच भव्य दिव्य आहे.

आता या मंदिराचं बांधकाम पूर्ण झालं असून, लोकार्पणाचा मुहूर्तही ठरला आहे. मराठा साम्राज्याचे संस्थापक उत्कृष्ट योद्धा, आदर्श शासनकर्ता म्हणून इतिहासावर ठसा उमटवणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचं मंदिर आता दिमाखात उभं राहीलं आहे. मुंबईमधील भिवंडीतल्या मराडे पाडा इथे हे मंदिर बांधण्यात आलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या या मंदिराचं भूमीपूजन 2018 मध्ये झालं होतं. मात्र, मध्यंतरी कोरोनामुळे कामाला उशीर झाला. आता मात्र मंदिराचं काम पूर्ण झालं आहे. हे शक्तीपीठ आता दिमाखात उभं राहिलं आहे. कसं आहे शिवरायांचे भव्य मंदिर ? - एकरभर जागेत 56 फूट उंचीचं भव्य मंदिर - मंदिराची रचना किल्ल्यासारखी, मंदिराभोवती 4 बुरूज - मंदिराला 36 फूट उंचीचं महाद्वार - गाभारा सभामंडप 2500 चौरस फूट क्षेत्राचा - मंदिरात सहा फूट उंचीची सिंहासनारूढ महाराजांची मूर्ती - सुप्रसिद्ध मूर्तिकार अरुण योगीराजांनी साकारली महाराजांची मूर्ती - मंदिराभोवती 36 चबुतऱ्यांमध्ये महाराजांच्या इतिहासकालीन प्रसंगांचे देखावे छत्रपती शिवाजी महाराजांच्या या मंदिरात वैदिक शिक्षण देण्याचा मानस आहे. हे मंदिर सर्वांना प्रेरणादायी ठरावं यासाठी शिवकालीन शस्त्र प्रशिक्षण देण्याचाही मनोदय आहे. येत्या १४ ते १७ मार्च या काळात तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती दिनी प्राणप्रतिष्ठा आणि मंदिराचा लोकार्पणाच्या भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आलंय. यावेळी महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील साधू-संत, महंत, वारकरी, शिवकालीन मावळ्यांचे वंशज उपस्थित रहाणार आहेत. या चार दिवसीय सोहळ्यात विविध धार्मिक, आध्यात्मिक व कला या कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचं हे भव्य मंदिर अक्षरक्षा डोळयांचं पारणे फेडणारं आहे. या मंदिरातील शिल्पकला पाहून आपणही आपसुकच शिवकाळात जातो. हे केवळ मंदिर नसून आपल्या सगळ्यांसाठी शक्तिपीठ असणार आहे.

# गोरगरिबांचे जीव कवडीमोल



आधुनिक काळातील विज्ञानसूर्य म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा काल म्हणजे १४ मार्च रोजी ७ वा स्मृतिदिन होता. ७ वर्षांपूर्वी १४ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ साली इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग जीवशास्त्राचे संशोधक होते. स्टीफन हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ. फ्रँक आणि इसाबेल या दाम्पत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले, कारण तेंव्हा दुसरे महायुद्ध चालू होते. पण काही दिवसांतच ते पुन्हा लंडनला परतले कारण त्यांचे वडील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख बनले होते. १९५० मध्ये हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थलांतर केले. येथेच १९५० ते १०५३ अशी तीन वर्ष त्यांनी सेंट अल्बान्स स्कुल फॉर गर्ल्स या शाळेत शिक्षण घेतले. ही शाळा मुलींची असली तरी तिथे मुलांनाही प्रवेश दिला जात होता. स्टीफन लहानपणापासून हुशार होते. त्यांना गणित, भौतिकशास्त्र आणि संगीताची खूप आवड होती. स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात विश्व उत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी प्रवेश घेतला, पण अवघ्या २१ व्या वर्षी अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोरोसिस (एएलएस ) या असाध्य रोगाने त्यांना ग्रासले. स्टीफन हॉकिंग जेमतेम दोन वर्ष जगतील असे त्यांना सांगण्यात आले. आधी ते खूप निराश झाले पण त्याच इस्पितळातील एका रोग्याला पाहून त्यांना आशेचा किरण दिसू लागला. या आजाराने त्यांना बहुविकलांगत्व आले. चालण्याफिरण्यासाठी त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. मग व्हील चेअरवर एक संगणक जोडण्यात आला. फक्त एक बोट वापरुन ते संगणकावर काम करू लागले. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाजही गेला पण त्यांनी हार मानली नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता, कार्यमग्नता आणि जीवनाविषयीचे प्रेम या गुणांच्या जोरावर त्यांनी दुर्धर आजारावर मात करीत कृष्णविवरासंदर्भात अनेक संशोधन करुन जगाला अचंबित केले. कृष्णविवरासंदर्भात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या ब्रिफ हिस्ट्री ऑफ टाईम या पुस्तकाने अनेक विक्रम केले. या पुस्तकावर आधारित अनेक मालिका व चित्रपट निघाले. रॉजर पेनरोज या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी सापेक्षतेवादाच्या सिद्धांतावर आधारित अवकाश व काळाची सुरवात बिगबँगमध्ये झाली असेल तर कृष्णविवरात शेवट असेल असा सिद्धांत मांडला. कृष्णविवरे काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन करतात. ब्रह्मांडाला कोणतीही सीमा नाही असे सिद्धांत त्यांनी मांडले. त्यांची अनेक संशोधने ही काळाच्या पुढची होती. म्हणून त्यांना आधुनिक काळातील न्यूटन असे म्हणतात. स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी व स्तिमित करणारे आहे. काळाच्या पुढे असणारा हा शास्त्रज्ञ आधुनिक काळात होऊन गेला, ही गोष्टच पुढील पिढीला स्तिमित करणारी ठरेल. स्टीफन हॉकिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे


# जी आर सी शाळेच्या प्रांगणात भ्रष्टाचार, अहंकाराची होळी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रंग आणि आनंदाचा सण होळी शुक्रवारी संपूर्ण भारतात मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आला. हा केवळ रंगांचा वर्षाव नाही तर वाईटावर चांगल्याच्या विजयाचे आणि सामाजिक एकतेचे प्रतीक आहे. हा संदेश देण्याच्या उद्देशाने कल्याणातील पिसवली येथील जीआरसी हिंदी हायस्कूलच्या प्रांगणात अनोख्या पद्धतीने होलिका दहन करण्यात आले. होलिका दहनात समाजात पसरलेल्या अहंकार, द्वेष, मत्सर, भ्रष्टाचार, अप्रामाणिकता, क्रोध आणि नकारात्मक ऊर्जा यांची होळी करण्यात आली.

शालेय संस्थेचे सचिव डॉ.जयप्रकाश शुक्ला यांनी विद्यार्थ्यांना होलिका दहनाचे धार्मिक, आध्यात्मिक व वैज्ञानिक महत्त्व समजावून सांगितले. संपूर्ण विधी आणि मंत्रोच्चारांनी पूजा संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाज उपाध्याय समितीचे संचालक बबन चौबे, जय गणेश पतपेढीचे संचालक निशाकांत मिश्रा उपस्थित होते. होलिका दहनानंतर शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी होळी खेळण्याचा खूप आनंद लुटला.

सर्वांनी एकमेकांना रंगांची उधळण करून, संगीत आणि नृत्याने होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी जीआरसी हिंदी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका पुष्पा शुक्ला, शिक्षिका वर्षा पाटील, सीमा पाठक, अदिती भोईर, नीतू सिंग व शिक्षक करण पाल आदी उपस्थित होते.



# उल्हासनगर मनपा परिवहनच्या परिक्रमेची वर्षपूर्ती ....



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेली १० वर्षं उल्हासनगर महानगर पालिकेतील परिवहन सेवा ठप्प होती. परंतु, गेल्या वर्षभरा आधीच ही सेवा कार्यान्वित झाली, आणि, शहरातील गोरगरीब प्रवाशांना माफक दरात एसी व नॉन एसी प्रवास उपलब्ध झालाय. पालिकेच्या या परिवहन उपक्रमाला १२ मार्च रोजी एक वर्ष पूर्ण झालंय. अर्थात उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन बससेवेच्या परिक्रमेचा वर्षापूर्वी सोहळा मोठ्या आनंदात साजरा केला.

साधारणत: २०१४ ते २०२४ पासून उल्हासनगर मधील बस सेवा दहा वर्षाकरिता ठप्प होती. यामुळे गोरगरीब प्रवाशांना रिक्षा शिवाय पर्याय नव्हता. अनेकदा बस सेवेची निविदा प्रक्रिया ही बारगळली. मात्र, मागील वर्षी १२ मार्च २०२४ रोजी तत्कालीन मनपा आयुक्त अजिज शेख यांच्या नेतृत्वाखाली वाहन विभागाचे प्रमुख विनोद केणे यांनी ही निविदा प्रक्रिया यशस्वी घडवून आणली. परिणामी ,उल्हासनगर, शहाड , बदलापूर, कल्याण या उपनगरांकरिता राष्ट्रीय हवा शुद्धीकरण प्रकल्पां अंतर्गत बारा मिटरच्या ५ वातानुकूलित व ९ मिटरच्या १० नॉन एसी बसेस उल्हासनगरच्या ताफ्यात सामील झाल्या. अजूनही ५ बसेस या ताफ्यात लवकरच रुजु होणार आहेत.

आता प्रवाशांना उल्हासनगर ते बदलापूर हा प्रवास ३० रुपयांमध्ये एसी प्रवास लाभतोय.. या बसेसच्या रोजच्या ५ फेऱ्या ४० चालक व ४० वाहक यांच्या मार्फत रहदारीचा खोळंबाही कमी होतोय. स्वतःचा आधार व चार्जिंग सेंटर असणारं या सर्व बसेस इलेक्ट्रिक चार्जिंग वर असल्याने प्रदूषणाचे प्रमाणही कमी आहे. सध्या उल्हासनगर मधील ट्रान्सव्होल्ट उल्हासनगर प्राय. लि. या कंपनीमार्फत ही परिवहन सेवा शहरात सेवा प्रवाशांना सेवा देतेय.

नुकतेच या कंपनीच्या गौरव वेदक, शशिकांत वडनेरे-आगार, तुषार महाले, .दीपा तिवारी, निशांत घाडगे-पाटील, रवीना कांबळे, आशिष कदम, श्रीधर खोत व सर्व चालक,परिवहन कर्मचारी यांनी आनंद साजरा केला.

नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या कारकिर्दीतही या बससेवेला व्यापक वेग प्राप्त होतोय .पंतप्रधान योजने अंतर्गत अजून निधी प्राप्त होऊन १०० बसेस बस थांबे उभे करून हे बससेवेचं जाळ वाढवण्याचा आयुक्तांचा मानस आहे. त्यामुळे लवकरच या बससेवेचा विस्तार आजूबाजूच्या जिल्ह्यां पर्यंत वाढेल. परिवहन सेवेच्या या वर्षपूर्ती निमित्त प्रवाशांमध्ये सध्या आनंदाचे वातावरण आहे.

# एमडी पावडरची तस्करी करणारा पोलिसांच्या ताब्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण : कल्याण पश्चिमेतील बैलबाजार भागात एक इसम मेफोड्रिन (एमडी) पावडरची तस्करी करत आहे, याची माहिती पोलीस उपायुक्तांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या पथकाने सापळा लावून बैलबाजार भागातून लाखो रूपये किमतीची सात ग्रॅम वजनाची एमडी पावडर पोलीस पथकाने जप्त केली आणि या पावडरची तस्करी करणाऱ्या इसमाला अटक केली. मातफ अनिस रईस (३३, रा. जुने मच्छी मार्केट, गोल्ड प्लाझा इमारत, कल्याण पश्चिम) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. गेल्या चार महिन्यात कल्याण पश्चिमेतील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर, बाजारपेठ विभाग, बैलबाजार भागातून गांजा, एमडी पावडरची तस्करी करणाऱ्या इसमांना अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. सततची कारवाई करूनही अंमली पदार्थांचे तस्कर तस्करी थांबवत नसल्याने पोलीस हैराण आहेत.

महात्मा फुल पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोध पथक गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना बैलबाजार चौकात एक इसम संशयास्पदरित्या आढळून आला. या भागात अंमली पदार्थांची चोरून तस्करी होत असते याची जाणीव पथकाला होती. त्यामुळे त्यांनी संशयास्पदरित्या इसमाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. त्यांच्या अंगझडतीत पथकाला प्रतिबंधित एमडी पावडर आढळून आली. आपणास खबर मिळालेला इसम हाच तो आहे याची खात्री पटल्यावर पथकाने त्याला अटक केली. त्याच्यावर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विवाहित महिलेच्या छेडछाडीप्रकरणी गोंधळ

## पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : टिटवाळा नजीकच्या बाल्याने परिसरात एका विवाहित महिलेची छेडछाड करत तिचे कपडे फाडण्याचा प्रयत्न आणि तिच्या पतीवर हल्ल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असली, तरी त्यावर परस्परविरोधी दावे समोर येत आहेत, त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

पीडित महिलेच्या म्हणण्यानुसार, ती आपल्या पतीसोबत दुचाकीवरून प्रवास करत असताना काही तरुणांनी तिची छेड काढली आणि तिच्या अंगावरील कपडे फाडण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगाला तिच्या पतीने विरोध केल्यावर आरोपींनी त्यांच्यावर हल्ला केला. हा प्रकार झाल्यानंतर तिने तात्काळ टिटवाळा पोलिस ठाणे गाठले, मात्र पोलिसांनी तिला अपेक्षित मदत न देता, उलट तिला जास्त बोलू नका, घरी जा असे सांगितले. या वागणुकीमुळे तिला आणि तिच्या पतीला मानसिक धक्का बसला असून, न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत झाल्याचे ती म्हणते.दुसरीकडे, पोलिसांचा याबाबतचा दावा वेगळाच आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, हा वाद छेडछाडीचा नसून पाण्यावरून झालेल्या भांडणातून निर्माण झाला आहे. तसेच, संबंधित दोन्ही गटांमध्ये आधीपासूनच वाद होते. जर पीडित महिलेसोबत खरंच छेडछाड झाली असती, तर तिने तत्काळ पोलिसांशी संपर्क साधायला हवा होता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे या संपूर्ण घटनेत नेमके कोण सत्य सांगत आहे आणि कोण खोटे, याचा शोध घेतला जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

या घटनेमुळे टिटवाळा परिसरात मोठा तणाव निर्माण झाला असून, पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत प्रशासन किती गंभीर आहे, यावर नागरिकांमध्ये रोष वाढला आहे. पीडितेला न्याय मिळेल का आणि प्रशासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कल्याणमध्ये धुलीवंदनाचा उत्साह



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : "बुरा ना मानो होली है" असे म्हणत धुलीवंदनच्या दिवशी कल्याणच्या रस्त्यांवर तरुणाई रंगांचा आनंद लुटताना दिसली. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या रंगांच्या उत्सवात नाहून निघाले होते. यंदाही कल्याणकरांनी पाणी बचतीचा संदेश देत कोरडी होळी खेळणे पसंत केले. तर काही ठिकाणी विविध सोसायट्यांमध्ये एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत आनंद लुटला. प्रत्येक गल्ली गल्लीत ग्रुप ग्रुपने तरुणाई रंगांचा हा उत्सव साजरा करत होती. काही ठिकाणी डी.जे. च्या तालावर थिरकताना अनेक जण पाहायला मिळाले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# उल्हास नदीत चौघे बुडाले

## धुळवडीनंतर अंघोळीसाठी उतरले होते पाण्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : धुळवडीचा आनंद घेतल्यानंतर उल्हास नदीत अंघोळीसाठी गेलेल्या चौघांचा मृत्यू झाला आहे. बदलापूरच्या वेशीवर असलेल्या चामटोली येथील नदीपात्रात ही घटना घडली चारही तरुण दहावीचे विद्यार्थी होते.




शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास बदलापूरच्या वेशीवर असलेल्या पोद्दार गृह संकुलातील सात ते आठ मुले धुळवड खेळल्यानंतर उल्हास नदीत अंघोळीसाठी गेले होते. या भागात नदीपात्राला खोली असून पाण्याचा अंदाज न आल्याने आर्यन मेदर (१६) हा तरुण बुडू लागला. त्यावेळी इतर तरुण त्याला वाचवण्यासाठी गेले. या प्रयत्नात आर्यन सिंग (१५) सिद्धार्थ सिंग (१६) आणि ओमसिंग तोमर (१५) हे सुद्धा बुडाले, अशी माहिती कुळगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी दिली आहे.

तरुण ज्या ठिकाणी गेले त्या भागात सहसा कुणी जात नाही अशीही माहिती पाटील यांनी दिली. तर हा प्रकार पाहून ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. यावेळी इतर चार मुलांना ग्रामस्थांनी सुखरूप पाण्याबाहेर काढले. या घटनेची माहिती मिळतच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थ, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या मदतीने चौघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. चौघांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी बदलापूरच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले होते.

# रेसिपी

## गोड बुंदी



साहित्य-

एक वाटी बेसन, पाणी, तळण्यासाठी अर्धा ग्लास रिफाइंड तेल, अर्धी वाटी गूळ, वेलची पूड

कृती -

सर्वात आधी बेसनात पाणी घालून घट्ट द्रावण बनवा. आता ५ मिनिटे द्रावण फेटल्यानंतर, साधारण वीस मिनिटे तसेच राहू द्या. आता एका पॅनमध्ये तेल गरम करा आणि त्यात बुंदी मेकरच्या मदतीने बेसनाचे मिश्रण घाला. तसेच तेलात बुंदीसाठी बेसनाचे मिश्रण घातल्यानंतर, बुंदी दोन्ही बाजूंनी चांगले तळून घ्या. आता तेलातून बुंदी काढा आणि बेसनाच्या सर्व पिठाचे बुंदी बनवा. गोडवा येण्यासाठी, एका पॅनमध्ये गूळ, पाणी आणि वेलची पूड घाला आणि मिक्स करा. गूळ चांगला शिजला आणि घट्ट झाला की त्यात बेसनाची बुंदी घाला आणि मिक्स करा. थंड झाल्यावर बुंदी एका प्लेटमध्ये काढा आणि प्रसाद म्हणून द्या.

# केडीएमसीच्या ई प्रभागात मालमत्ता सिलची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली (पूर्व) ई प्रभागक्षेत्रातील 'लोढा पलावा' येथील मिळकत धारकांना वारंवार भेटी व नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करित नसल्यामुळे, महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड, यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या उपआयुक्त, स्वाती देशपांडे, यांच्या मार्गदर्शनाखाली ई प्रभागाचे सहा. आयुक्त, तुषार सोनावणे, अधिक्षक रविंद्र हमरे, वरिष्ठ लिपिक बाळु दिवटे, सतिश कांबळे, लिपिक गोविंद हांडोरे, श्रीराम पाटील, किरण जोशी, रूपेश जाधव, भानुदास पाटील यांनी थकबाकी रक्कमेपोटी 'लोढा पलावा' येथे मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई केली. या कारवाईत एकुण ७६ मिळकतींवर अटकवणीची (सील) कारवाई करण्यात आली. या मिळकतींची एकुण येणे रक्कम रू.७४ लाख ३१ हजार ५४३ असुन, या मिळकतींपैकी २२ मिळकत धारकांनी रू. १८ लाख ७६ हजार १५७ इतकी रक्कम भरणा केली. उर्वरीत ५४ मिळकत धारकांकडून रू.५५ लाख ५५ हजार ३८६ इतकी रक्कम येणे बाकी आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने "अभय योजना २०२४-२०२५" जाहिर केली असून, दि. १५ मार्च २०२५ पर्यंत संपूर्ण थकबाकीसह चालु वर्षाचे कराची संपुर्ण रक्कम एकरक्कमी भरल्यास १०० टक्के शास्ती (दंड/व्याज) माफी देय आहे. या योजनेचा करदात्यांनी लाभ घेवून कराचा भरणा करावा.

ज्या मिळकत धारकांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी मालमत्ता कराचा संपूर्ण भरणा करून दंडाची व कायदेशीर कारवाई टाळावी असे आवाहन करदात्यांना करण्यात आले आहे.

# राज्यात साडेतीन कोटी आयुष्यमान कार्ड देण्याचे उद्दिष्ट

## – आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : १३०० आजारांवर उपचार करण्यास सर्वसामान्य नागरिकांना लाभदायी ठरणारे महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य कार्ड राज्यातील अनेक नागरिकांकडे असले तरी १९०० आजारांवर विनामूल्य उपचार देणारे आयुष्यमान कार्ड राज्यातील फक्त २७- २८ हजार नागरिकांकडे उपलब्ध आहे. येत्या काही महिन्यात आयुष्यमान कार्ड धारकांची राज्यातील संख्या साडेतीन कोटी पर्यंत नेण्यासाठी मिशन मोडवर काम हाती घेण्यात आले असून त्यामुळे अनेक नागरिकांना विविध आरोग्य विषयी लाभ सहजगत मिळतील असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी पालघर येथे प्रतिपादन केले. राज्यात येत्या महिन्याभरात १०८ प्रणाली अंतर्गत १७०० सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध होतील अशी ही माहिती त्यांनी दिली.



देशभरात सर्व ठिकाणी उपयुक्त ठरणारे आयुष्यमान कार्ड काढण्यास नागरिकांनी आळस केल्याने अशा कार्डधारकांची संख्या राज्यात २८ लाखांपेक्षा कमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांमध्ये राबविण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमात आयुष्यमान कार्डधारकांची संख्या साडेतीन कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असून आरोग्य यंत्रणा तसेच इतर विभागाच मदतीने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मिशन मोडवर काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. सन २०१४ मध्ये राज्य सरकारने करारनामा करून १०८ प्रणालीच्या रुग्णवाहिका सेवा सुरू केली. या कराराला १० वर्षांचा कालावधी उलटला असून रुग्णवाहिकांची स्थिती खालावली असून त्यामुळे सेवेच्या दर्जावर परिणाम झाल्याचे आरोग्यमंत्री यांनी सांगितले. जून २०२३ मध्ये राज्य सरकार बरोबर करण्यात आलेल्या नवीन करारनामा मध्ये सध्या असलेल्या ९५७ रुग्णवाहिकांऐवजी १७०० सुसज्ज रुग्णवाहिका घेण्याची तरतूद करण्यात आली असून निवडणुकीदरम्यान असणारी आचारसंहिता व इतर तांत्रिक कारणांमुळे हा प्रस्ताव रखडला होता.

सुमारे ६०० कोटी रुपयांच्या या प्रस्ताव करारनामा करण्याच्या अंतिम टप्प्यात असून एका महिन्याभराच्या कालावधीत हृदयरोग संदर्भातील रुग्णांना देखील हाताळू शकणाऱ्या आयसीयू रुग्णवाहिका १०८ प्रणालीच्या ताफ्यात दाखल होतील असे प्रकाश अबिटकर यांनी पत्रकारांना माहिती दिली. विविध आरोग्य संस्थांमध्ये असणाऱ्या १०२ प्रणालीच्या रुग्णवाहिका रुग्णालयात दाखल रुग्णांच्या वाहतुकीसोबत अपघात व इतर गंभीर रुग्णांना संदर्भीय सेवा देण्यासाठी वापरात आणाव्या अशा सूचना त्यांनी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या.करोना काळात अनेक ठिकाणी प्राणवायू निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्यात आले तसेच मोठ्या प्रमाणात प्राणवायूच्या सिलेंडरची खरेदी करण्यात आली होती. सध्या हे प्रकल्प वापरत नसून अशा प्रकल्पांचा सार्वजनिक उपयोग करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभाग विचार करत असल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### टीम परिवर्तन संस्थेच्या माध्यमाने

# 'गाव तिथे ग्रंथालय' उपक्रम

## जिल्हा परिषदेच्या पाच शाळांमध्ये देण्यात आले क्लासरूम लायब्ररीचे सेटअप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टीम परिवर्तन संस्था प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि क्रीडा उपक्रमांच्या माध्यमाने ग्रामीण भागातील वंचित घटकांच्या प्राथमिक समस्या सोडवण्यासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमाने कसारा परिसरात दुर्गम खेड्यापाड्यात काम करणाऱ्या दि वात्सल्य फाउंडेशन संस्थेच्या मदतीने



थराचापाडा, कोळीपाडा, ढेंगणमाळ, सुसरवाडी आणि तेलमपाडा या जिल्हा परिषदेच्या पाच शाळांमध्ये प्रथम संस्थेच्या लेट्स रिड या उपक्रम अंतर्गत क्लासरूम लायब्ररीचे सेटअप देण्यात आले.

ग्रामीण भागातील मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी त्याचबरोबर अवांतर वाचनातून त्यांची जिज्ञासा वाढावी हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे अविनाश पाटील यांनी सांगितले. नागरिकांकडे वाचुन झालेली पुस्तके या उपक्रमासाठी देण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष तुषार वारंग यांनी केले. या उपक्रमाचे व्यवस्थापन वात्सल्य फाउंडेशन संस्थेचे महेंद्र पाटील यांनी केले. यापुढेही ग्रामीण भागात शैक्षणिक उपक्रम चालु ठेवत गरजु विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा मिळवुन देण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील असा निर्धार संस्थेच्या वतीने करण्यात आला.

# म्हारळ मधील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला पोलिसांनी केले जेरबंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील म्हारळ येथे 1वर्षोपूर्वी 18वर्षीय तरूणाची त्याच्या 4 मित्रांनी अग्निशस्त्राने गोळ्या घालित निर्घृणपणे हत्या केली होती. या हत्या प्रकरणात तीन आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. या गुन्ह्यातील एक आरोपी फरार होता. खुनाच्या गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीस कल्याण तालुका पोलिसांनी अटक केली आहे. परवेज अकबर अली शेख असे याचे नाव आहे.

याबाबत वृत्त असे आहे कि, कल्याण ता. पोलीस ठाणे हद्दीतील म्हारळगांव, ता. कल्याण येथील सुर्यानगर परिसरात 9जानेवारी 2024रोजी राजन उर्फ जानु श्याम येरकर या १८ वर्ष तरुणाची त्याच्या ४ मित्रांनी मिळुन अग्निशस्त्राने गोळी झाडून हत्या केली होती. त्याबाबत कल्याण ता. पो.स्टे.मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील ३ जणांना यापूर्वी अटक करण्यात आली होती.दरम्यान, गुन्हयातील फरारी आरोपी परवेज अकबर अली शेख याला अटक करण्यात आली नव्हती तो बिहार व इतर राज्यात वास्तव्य करीत होता व अधूनमधून कल्याण परिसरात येत होता. दरम्यान, फळेगांव, ता. कल्याण येथे परवेज येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुषंगाने पोलिसांनी या ठिकाणी सापळा रचून परवेजला अटक केली.

हि कामगिरी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण भरत तांगडे, उप विभागीय पोलीस अधिकारी मुरबाड विभाग, जगदीश शिंदे, पोलीस निरीक्षक कल्याण ता. सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि मुदगुन, पोउनि मोरे, पोहवा बडगे, पोना भोईर, पोशि निर्मल, बावदाने, काळे, गुजर यांच्या पथकाने केली आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी कैलाश खेर यांचे गाणे

## 'वामा - लढाई सन्मानाची' या आगामी मराठी चित्रपटातुन खास भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आगामी मराठी चित्रपट 'वामा - लढाई सन्मानाची' "ही प्रभावी कथा लवकरच प्रदर्शित होणार आहे. महिलांची ताकद, लवचिकता आणि समानतेसाठीच्या लढ्याबद्दलचे संभाषण उंचावण्यासाठी सज्ज आहे. महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करणारी अशी कथा आहे. प्रसिद्ध गायक कैलाश खेर यांनी अलीकडेच या चित्रपटाचे शीर्षक गीत ध्वनिमुद्रित केले आहे, जे महिला सक्षमीकरणाच्या भावनेने प्रतिध्वनित होणारे एक चैतन्यदायी गाणे आहे. मंदार चोळकर यांचे गीत आणि हृजू रॉय यांनी संगीतबद्ध केलेले हे गाणे महिलांच्या सामर्थ्यासाठी आणि



दृढनिश्चयासाठी एक आकर्षक शक्ती ठरेल. हे एक शक्तिशाली आणि प्रेरणादायी गीत आहे, ज्यात महिलांची कामगिरी, शक्ती आणि दैवी उर्जेचे मूर्त स्वरूप म्हणून त्यांची भूमिका साजरी केली जाते आणि त्यांची तुलना दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती या देवींशी केली जाते. या गाण्याचा उद्देश लैंगिक समानतेला प्रोत्साहन देणे आणि महिलांसाठी सुरक्षित जग निर्माण करण्याच्या कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे. गाण्याचे ध्वनिमुद्रण करताना कैलाश खेर भावुक झाले आणि त्यांनी 8 मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी अनेक प्रादेशिक भाषांमध्ये गायले आहे, परंतु या मराठी गाण्याला त्यांच्या हृदयात विशेष स्थान आहे, असे सांगून, संगीत हे भाषेच्या मर्यादा ओलांडते हे त्यांनी अधोरेखित केले. हे गाणे प्रदर्शित झाल्यावर संगीत प्रेमींनी ते स्वीकारावे आणि त्याला पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ओंकारेश्वर प्रॉडक्शन अंतर्गत अशोक आर. कोंडके दिग्दर्शित आणि सुब्रमण्यम के निर्मित, 'वामा - लढाई सन्मानाची' हे लैंगिक असमानता आणि पितृसत्ताक दडपशाहीच्या वास्तविकतेला संबोधित करणारे एक कठोर सामाजिक चित्रपट आहे. सरलाच्या कथेद्वारे, हा चित्रपट महिलांच्या प्रतिष्ठा आणि सन्मानासाठीच्या संघर्षांवर प्रकाश टाकतो, ज्यामुळे तो एक विचारप्रवर्तक आणि वेळेवर सिनेमाचा अनुभव बनतो. धीरज कातकाडे यांचे छायाचित्रण, तरंग वैद्य यांचे संवाद आणि रवी कोंडके यांच्या कला दिग्दर्शनासह, या चित्रपटाने दृश्य आणि भावनिकदृष्ट्या आकर्षक अशी एक शक्तिशाली कथा जिवंत केली आहे.

# राहनाळ शाळेत पर्यावरणपूरक होळी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे पर्यावरणपूरक होळी चा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळ सत्रात विद्यार्थ्यांना अजय पाटील लिखित दिग्दर्शित "धुळवड" हा लघुचित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटांमध्ये केमिकल मिश्रित रंग, त्याचबरोबर पाण्याने भरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा होणारा दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर कायमचा कोरला गेला.

विद्यार्थ्यांनी स्वतः आजूबाजूचा केअर कचरा गोळा केला, गोवऱ्या, कापूर टाकून होळी तयार करण्यात आली. मनातील वाईट विचार, सवयी कागदावर लिहून तयार केलेल्या पताकांनी होळी सजवली. शाळेतल्या सर्व शिक्षकांनी पारंपारिक पद्धतीने हहोळीची विधिवत पूजा केल्यानंतर इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनीने होळी दहन केले. होळीच्या गाण्यावर मुलांनी नृत्याचा ठेका धरला. या उपक्रमाची संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांची आहे.

विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले इको फ्रेंडली रंग, म्हणजेच पर्यावरण पूरक रंग एकमेकाला लावून होळीच्या शुभेच्छा दिल्या. अंकुश ठाकरे यांनी पाणी बचतीचा मूलमंत्र मुलांना दिला. रसिका पाटील यांनी होळीची कथा सांगितली. चित्रा पाटील यांनी केमिकल मिश्रित रंगांचे दुष्परिणाम मुलांना समजावून सांगितले. संध्या जगताप यांनी होळीसाठी वृक्ष तोड करू नये असा मौलिक संदेश दिला. माया सोनकांबळे यांनी होळी सणाचे महत्त्व विशद केले. सर्व विद्यार्थ्यांनी पाणी बचत करणे, प्लास्टिकच्या पिशव्या, फुगे न वापरणे आणि केमिकल मिश्रित रंगाचा वापर करणार नाही अशी शपथ घेतली. पर्यावरण पूरक होळीची चर्चा संपूर्ण गावांमध्ये सुरू आहे.

### राष्ट्रवादी शरद पवार गटाची

# कल्याण ग्रामीणची बैठक संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


टिटवाळा : कूषी उत्पन्न बाजार समिती सह इतर काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका काही दिवसात लागणार आहेत, त्या अनुषंगाने राष्ट्रवादी शरद पवार गटाची कल्याण तालुका ग्रामीण बैठक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व राष्ट्रवादीचे जेष्ट नेते जयराम मेहेर यांच्या अध्यक्ष तेखाली संपन्न झाली, यावेळी बैठकीला कोंडू नाना भोईर ,रमेश जाधव अवेश जुवारी रविद्रं टेंभे गोपाळ जाधव दिनेश जाधव संजय मोरे संतोष शेलार कान्हा भोईर हरीचंद्र धुमाळ सतोष पितांबरे दता ठाकरे गुरुनाथ झुगरे महेद्रं नन्नावरे ,यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटि सदस्य कार्यकरते हजर होते अनेक ग्रामपंचायत व सोसायटी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते,

बैठकीमध्ये येणाऱ्या निवडणुकीवर सविस्तर चर्चा करण्यात आली, कायैकतै यांनी आपले मनोगत व्यक्त केले, निवडणुकीला कशा प्रकारे सामोरे जायाचे याविषयी माहिती दिली, महाविकास आघाडीने एकत्र यऊन लोकशाही पध्दतीने निवडणुकीला सामोरा जाण्याचा निरधार करण्यात आला, रविंद्र टेंभे यानी उपस्थित पाहुणे यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले,

# शिक्षिकांकडून विद्यार्थ्याला मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण – मध्य रेल्वेतील वरिष्ठांबरोबर असलेल्या प्रशासकीय कामातील वादातून कल्याण पश्चिमेतील सेंट्रल रेल्वे शाळेत शिक्षण घेत असलेल्या आपल्या आठ वर्षाच्या मुलाला मारहाण होत असल्याची तक्रार विद्यार्थ्याच्या वडिलांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात केली आहे. याप्रकरणी दोन शिक्षिकांविरुध्द शनिवारी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी विद्यार्थ्याच्या पालकांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडेही तक्रार केली आहे. या विभागातील अधिकाऱ्यांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.



मुलाला शाळेत शिक्षकांकडून होणाऱ्या मारहाणीमुळे मुलगा घाबरला आहे. तो शाळेत जाण्यास तयार होत नाही. त्याचे शालेय भवितव्य धोक्यात आले आहे. आपण जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या समन्वय अधिकारी श्रध्दा नारकर यांच्याकडे तक्रार केली. नारकर यांनी आपल्या मुलाची विचारपूस केली. त्यांच्यासह आपण पोलीस ठाण्यात हजर होऊन सेंट्रल रेल्वे शाळेतील शिक्षिका रोहिणी तिवारी, प्रज्ञा कदम यांच्या विरुध्द अल्पवयीन मुलांची काळजी व संरक्षण, बाल हक्क संरक्षण कायद्याने तक्रार करत आहोत. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

या बातमी संदर्भाच्या अधिक माहितीसाठी मध्य रेल्वे सेंट्रल शाळेच्या प्राचार्य ज्योती श्रीवास्तव यांना मोबाईल वरून सतत संपर्क केला. लघु संदेश पाठवून माहिती घेण्याचा प्रयत्न केला त्यांनी कोणत्याही प्रतिसाद दिला नाही. मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉक्टर स्वप्निल नीला यांना लघु संदेश पाठवून प्रत्यक्ष संपर्क करून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडूनही प्रतिसाद मिळाला नाही.

### जंगलातील सततच्या वणव्यामुळे

# डोंगरची काळी मैना नष्ट होण्याच्या मार्गावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : जंगलातील सततच्या वणव्यामुळे हजारो सरपटणारे प्राणी मृत्युमुखी पडत आहेतच. त्याचबरोबर जंगलातील करवंदे म्हणजे डोंगरची काळी मैना नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे जंगलात करवंदे झाडे लागलेल्या वनव्याच्या आगीमुळे करवंदेची झाडे जळून खाक होत आहेत. त्यामुळे जंगलातील करवंदे दरवर्षे लागणाऱ्या वणव्याच्या आगीमुळे



जळून खाक होत आहेत त्यामुळे गेली चार ते पाच वर्षे पासून करवंदे म्हसा, सरळगाव धसई,मुरबाड, टोकवडे, या प्रमुख बाजारात विक्रीसाठी फार कमी प्रमाणात येतात त्यामुळे करवंदे शौकिकांना करवंदे खायला मिळत नाही त्याचबरोबर आदिवासी बांधवांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी गाव स्तरावर कारभार चालवणाऱ्या ग्रामपंचायतीने आपापल्या जंगलाची आगीपासून संरक्षण कसा करता येईल तसेच जाणून बुजून जंगलात आग लावणाऱ्या व्यक्तीला पकडून दंडात्मक कारवाई करण्यासाठी वन खात्याशीसंपर्क करून तसेच ग्रामपंचायत पातळीवर विशेष ग्रामसभा आयोजित करावी त्यामध्ये जंगलात आग लागली जाते याविषयी कडक धोरण अवलंबिले पाहिजे तरच जंगलाची वनसंपदा अबाधित राखली जाईल त्याचबरोबर आदिवासी बांधवांना सुद्धा रोजगार उपलब्ध होईल अशी मागणी आदिवासी बांधवांनी संबंधित ग्रामपंचायतकडे व वन खाद्याकडे केली आहे.

news.thanejeevandeep@gmail.com

दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# खडवली येथे पारंपरिक पद्धतीने होळी उत्सव साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : होळीचा सण मोठा नाही आनंदाचा तोटा,होळी उत्सव संपूर्ण भारतात मोठ्या आनंदात आजही साजरा केला जातो. जुन्या परंपरा चालीरीती आजही टिकवून ठेवल्या आहेत. होळीला उत्सवाला जुना शब्द शिमगा असे हि बोलले जाते. होळी उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत आसतांना खडवली पश्चिम गुरुदत्त मंदिर जवळ येथील बाळगोपाळांनी होळी उत्सव साजरा केला, होळीला सुंदर प्रकारे सजवली होती.
होळीची पारंपरिक पद्धतीने पुजा केली. त्या नंतर महिलांनी आरती करून पुराणपोळीचे नैवेद्य दाखविले. होळी भोवती गोल गोल फेऱ्या मारल्या, त्या नंतर श्रीफळ वाढविण्यात आला. होळी पेटवून मुलांनी,महिलांनी गाणी बोलुन नाचुन आनंद उत्सव साजरा केला. एकमेकांना होळीच्या शुभेच्छा दिल्या. आजही खेड्या पाडयात होळी पंरपरा दिसून येत आहे.

## संक्षिप्त

### श्रीवज्रेश्वरी शक्तीपिठावर महासत्संग सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : अखिल मानव जातीचे कल्याण,विश्वशांती आणि राष्ट्रहितासाठी दिंडोरी प्रणीत अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्गतर्फे भिवंडी तालुक्यातील श्री क्षेत्र वज्रेश्वरी या शक्तिपीठावर मंगळवार दि. १८ मार्च रोजी परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या सान्निध्यात राष्ट्रीय महासत्संग सोहळा तथा १०८ कुंडात्मक श्री वज्रचंडी यज्ञ, श्री दुर्गासप्तशती पठण आणि श्री चक्रराज श्रीयंत्र पूजन या सर्वोच्च आध्यात्मिक सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.
आदिशक्ती श्री पार्वती मातेचे रूप असलेल्या श्री वज्रेश्वरी मातेचा उल्लेख नवनाथ भक्तिसार ग्रंथात आढळतो. हे देवस्थान अत्यंत शक्तिशाली, जागृत आणि भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे आहे. येथील गरम पाण्याची कुंडेही प्रसिद्ध आहेत. या क्षेत्राचे पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आज्ञेने आणि आशीर्वादाने श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे जनहितासाठी ही सेवा घेण्यात येत आहे.
सेवामार्गातर्फे राष्ट्र, समाज आणि विश्वशांतीसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. या सर्वच उपक्रमांमध्ये सेवेकऱ्यांचा आजवर अभूतपूर्व प्रतिसाद लाभतो आहे. याच श्रृंखलेमध्ये श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे चाळीस एकर इतक्या विस्तीर्ण क्षेत्रावर हा उपक्रम होत आहे. दि.१८ मार्च रोजी सकाळी सहा ते नऊ या वेळेत भूपाळी आरती, श्री दुर्गा सप्तशती पठण,हवन, तर्पण, अशी पंच अंगात्मक सेवा अर्थात वज्रचंडी यज्ञ होईल. त्यानंतर सकाळी नऊ ते साडेदहा वाजेपर्यंत श्री चक्रराज श्री यंत्राची सेवा होईल. सकाळी साडेदहा वाजता महाआरती झाल्यावर परमपूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांचे अमृततुल्य हितगुज झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल. आणि या दिव्य वज्रचंडी यज्ञाची सांगता होईल.
राष्ट्रहितासाठी घेण्यात येत असलेला हा आध्यात्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुंबई,ठाणे, पालघर, रायगड परिसरातील सेवेकर्यानी कंबर कसली आहे. या कार्यक्रमाच्या प्रचार प्रसारासाठी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे उपव्यवस्थापक गुरुपुत्र नितीन मोरे यांनी नुकतेच मुलुंड, घाटकोपर ,कळवा, विरार ,पालघर ,भाईंदर , कोळसेवाडी, चाकण, राजे शिवाजीनगर आणि शिक्रापूर येथील सेवामार्गाच्या केंद्रांमध्ये मार्गदर्शन केले. श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथील १८ मार्चचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवेकऱ्यांकडून जय्यत तयारी केली जात आहे.

### ठाणे जि.प.चे माजी सदस्य भानुदास शेलार यांचे निधन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
बदलापुर : वांगणी तील जेष्ठ राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते तथा ठाणे जिल्हा परिषदेच्या वांगणी गटाचे दोन वेळा सदस्य पद भूषविलेले भानुदास नारायण शेलार यांचे मंगळवार दि.11 मार्च रोजी आकस्मिक निधन झाले. वांगणी ग्रामपंचायतीचे दोन वेळा सरपंच आणि ठाणे जिल्हा परिषदेचे दोन वेळा सदस्य राहिलेले भानुदास शेलार हे निगर्वी स्वभावाचे गोरगरिबांना सातत्याने मदत करणारे लोकप्रिय कार्यकर्ते होते. आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत त्यांनी किसन कथोरे यांना भक्कम साथ दिली. वांगणी तील महात्मा फुले विद्यामंदिर,गावातील विठ्ठल मंदिर,पाणीपुरवठा योजना यांसह विविध संस्थां मंडळे यांना त्यांनी उदार हस्ते आर्थिक मदत केली. तंटामुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्षे कार्यरत असताना त्यांनी वांगणी चा सामाजीक व धार्मिक सलोखा अबाधित राखण्यात मोलाचे योगदान दिले.सर्वच स्तरातील जनतेचा अफाट लोकसंग्रह असल्याने त्यांच्या अंत्यसंस्कार वेळी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. भानुदास शेलार यांच्या निधनाने वांगणी परिसराने एक सुस्वभावी सुसंस्कृत कार्यकर्ता गमावला अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# नरेंद्र पवार फाऊंडेशनतर्फे १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत 'छावा' चित्रपट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, बलिदानावर आधारित छावा चित्रपटाने शिवप्रेमी आणि इतिहास प्रेमींना चांगलीच भुरळ घातली आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा हा दैदिप्यमान इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने कल्याणातील माजी आमदार नरेंद्र पवार फाऊंडेशनतर्फे 12 वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शोचे आयोजन करण्यात आले होते. कल्याणातील एसएम5 चित्रपटगृहात आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले.
छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, त्यांनी मुघलांशी दिलेली कडवी झुंज आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्य टिकवण्यासाठी त्यांचे योगदान या सर्वांचा मिलाफ म्हणजे "छावा चित्रपट". या चित्रपटाने केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरात नव्हे तर जगभरात भगवं वादळ उभे केले आहे.
हिंदवी स्वराज्य आणि आपल्या धर्माचे रक्षण करण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी गाजवलेला पराक्रम आणि त्यासाठी दिलेले बलिदान नव्या पिढीसमोर पोहचणे आवश्यक आहे. नेमक्या याच उद्देशाने



आपण 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम आयोजित केल्याची माहिती नरेंद्र पवार फाउंडेशनचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली. तसेच या चित्रपटाला विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद पाहून आपल्याला अधिक आनंद झाल्याची भावनाही पवार यांनी यावेळी व्यक्त केली.
तर आमच्या पिढीला हिंदवी स्वराज्याचा इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान माहिती होणे आवश्यक आहे. त्यामुळे इतर अनावश्यक गोष्टी करण्यापेक्षा आणि पाहण्यासाठी आमच्यासारख्या युवा पिढीने हा चित्रपट पाहणे आवश्यक असल्याचे आग्रही मत हा चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.
यावेळी माजी आमदार नरेंद्र पवार, सामाजिक कार्यकर्त्या हेमा पवार, प्रिया शर्मा, सदा कोकणे, चंद्रलेखा गायकवाड, संगीता घाटे, यशोदा पाटील, जनार्दन कारभारी, किशोर म्हस्के, विवेक गायकर, किशोर खैरनार, प्रवीण हेंद्रे, विकास साळवी तसेच नरेंद्र पवार फाउंडेशनचे पदाधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बिगारीची हत्या
## तीन जण अटकेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण तालुका ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील निबंवली गाव शिवारात सम्रुध्दी महामार्गाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी सागर सुरेश गोथडे यांची निर्घृणपणे हत्या प्रकरणी तीन आरोपींना टिटवाळा पोलिसांनी कौशाल्यपूर्ण तपास करीत तांत्रिक विश्लेषण आधारे धरमपुर गुजरात राज्यातून अटक केली आहे.
टिटवाळा पोलीस स्टेशन च्या हद्दीतील निंबवली गाव परिसरात सम्रुध्दी महामार्गाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी बिगारीचे काम करीत एकत्र राहत असलेल्या सुरेश गोथडे यांची 2मार्च 2025 रोजी बिगारीचे काम करणाऱ्या तीन साथीदारांनी भांडण झाल्याने डोक्यात धारदार शास्त्राने वार करीत जीवेठार मारीत पोबारा केला होता. या प्रकरणी टिटवाळा पोलिसांनी तपास पथका मार्फत आरोपीचा शोध सुरू केला. आरोपीत हे बिगारी काम करणारे, मोबाईल न वापरणारे व कामानिमित्त अधिकाधिक बाहेर राहणारे तसेच घरातील लोकांचे संपर्कात नसल्याने आरोपींचा शोध घेण्याकरीतामोठे आव्हान झाले होते. आरोपींचा कोणताही कायम ठिकाणा नसताना कल्याण तालुका पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण कक्षातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी खडवली, नाशिक शहर परिसर, वणी, दिंडोरी अशा शहरातील साधारण 60 ते 70 ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज पाहणी करुन व आरोपींच्या नातेवाईकांकडुन प्राप्त माहितीनुसार तांञिक विश्लेषण आधारे विशाल ऊर्फ मामु किशोर माळी, वय - 24 वर्ष, गणेश ऊर्फ पंडित तुकाराम सुर्यवंशी, वय - 34 वर्ष, बद्रीनाथ सुधाकर पाटील, वय – 43 वर्ष, सर्व राहणार - मालेगांव या फरारी आरोपींना धरमपुर, राज्य गुजरात येथुन 13 मार्च 2025 रोजी अटक केली.
या गुन्ह्यातील आरोपींना न्यायालयात हजर केले असता 17मार्च पर्यंत पोलीस कस्टडी न्यायालयाने सुनावली आहे.
हि कामगिरी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण भरत तांगडे, उप विभागीय पोलीस अधिकारी मुरबाड विभाग जगदीश शिंदे, पोलीस निरीक्षक, सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि मुदगुन, पोउनि मोरे, पोना भोईर, पोशि निर्मल, बावदाने, काळे, गुजर या पथकाने केली आहे.

## पांगारा

कास्ठ काळे ,चिवट खर्म रे
पाषाणच कणखर स्मरे
डोई लालेलाल अंगार तुरे
भासती ज्वाला
वनव्याच्या बरे /1/

वरदान तुज दिले
असे शिवाने
चमकती त्रीदल
हिरवी पाने.
देहावर जळती
लाख मशाली
घेऊन दिवट्या,
वसंतात फुले /2/

सह्याद्रिच्या कडेकपारी
त्यागाची ती पखरण सारी
लाख पताका भगव्या हाती
आला फुन्कीत
वसंत तुतारी/3/

वीर दौडती निधड्या छाती
रक्त रंजित समशेरी हाती
कडेकपारी विहंग करती
कुंजन पान्गार्या वरती/4/

**कवी :**
**किसन इसामे,**
**मुरबाड**

# सगळ्या माणसांका, पोरांका, व्यसनापासून दूर ठेव रे महाराजा

## पारंपरिक मालवणी भाषेत गाऱ्हाणे घालत विद्यार्थ्यांची होळी साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : बारा गावच्या, बारा वेशीच्या, बारा गल्लीच्या, बारा बावडीचा राखवालदार रे महाराजा, जा काय वाकडा तिकडा ईडा पिडा हा ती सगळ्यांवरती दूर कर रे महाराजा, सगळ्या माणसांका, पोरांका, व्यसनापासून दूर ठेव रे महाराजा, अशा मालवणी भाषेत होळी समोर विद्यार्थ्यांनी पारंपारिक गाऱ्हाणे घालत होळी साजरी केली.
कल्याण पूर्व येथील सम्राट अशोक विद्यालयात शिक्षणाबरोबर कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध सन साजरे



करून संस्कृतीचे दर्शन घडविले जाते. विद्यार्थ्यांनी होळी समोर गाऱ्हाने घालत भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, अहंकार, क्रूरबुद्धी, व्यसन चा नायनाट होवो. अशा आशयाचे पत्रक होळीच्या अग्नित टाकून दहन केले.तसेच होळी खेळताना प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नका नैसर्गिक रंगाचा वापर करा पर्यावरणाचे संतुलन बिघडणार नाही.प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्या असा सल्लाही कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी दिला.
संस्थेचे अध्यक्ष पी. टी. धनविजय प्राथमिक मुख्याध्यापिका सुजाता नलावडे, गुलाबराव पाटील यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष पी. टी धनविजय यांनी होळीची पूजाअर्चा करून कार्यक्रमाला सुरुवात केली. सहशिक्षक रामभाऊ बोराडे, संतोष जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने होळी तयार करून रांगोळी काढत कार्यक्रम यशस्वी केला.

# बारावी निवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षाचा निरोप समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वासिंद : येथील मोहिली-अघई विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट (कोकमठाण) संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलातील आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कूल मधील इयत्ता बारावीच्या निवासी विद्यार्थ्यांचा या शैक्षणिक वर्षाचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.
परमपूज्य सद्गुरू आत्मा मालिक माऊलीच्या कृपा आशिर्वादाने, संत परिवाराच्या प्रेरणेतून संस्थेचे विश्वस्त मंडळ व स्थानिक व्यवस्थापन समितीचे विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाने इयत्ता 12वी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षाचा समारोप कार्यक्रम पार पडला.
यावेळी संस्कृतिक कार्यक्रमाचे



आयोजन करून नृत्य, गायन, तसेच कार्यक्रमाचे समारोप ध्यानद्वारे करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना भेटवस्तू वाटप व त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन करण्यात आले.
या कार्यक्रमप्रसंगी संत भारत माता, कार्याध्यक्ष तथा विश्वस्त उमेश जाधव, केंद्र प्रमुख बाळकृष्ण बांगर, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डी.डी. शिंदे, स्टेट बोर्ड स्कूल प्राचार्य पंकज बडगुजर, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल प्राचार्य कैलास थोरात, स्थनिक सदस्य अनंत गायकवाड, जनरल व्यवस्थापक उल्हास पाटील आदीजण उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी शिक्षक- शिक्षकेतर, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले..

# रुग्ण व त्यांचे नातेवाईक डॉक्टरांत देव शोधतात – डॉ कैलास पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : रुग्णाचे नातेवाईक डॉक्टरांच्या भरोशावर तुमच्या हवाली रुग्णांना करत असतात. अशावेळी तुम्ही सगळ्या बाजूंनी त्यांना मदत करणं हे तुमचं पहिलं कर्तव्य असतं. तेव्हा राजकीय प्रभाव इतर संघर्ष टाळावे लागतात. डॉक्टरांनी हलगर्जीपणा दाखवला की मग रुग्णाचे नातेवाईक संतापात आणि वाद निर्माण होतो. रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक डॉक्टरांमध्ये देव शोधतात. त्यामुळे आपल्याला रुग्णांना सर्वप्रथम मदत करून बरं करणे हे ध्येय असले पाहिजे. असे प्रतिपादन ठाणे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर कैलास पवार यांनी केले.



ते अंबरनाथ मध्ये अंबरनाथ मेडिकल चॅरिटेबल असोसिएशनच्या अध्यक्षपदी नुकतेच नियुक्त झालेल्या डॉ. गणेश राठोड यांच्या पदग्रहण समारंभात उपस्थित डॉक्टरांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात होत असलेल्या मेडिकल इन्शुरन्सच्या सावळ्या गोंधळाबद्दलही चिंता व्यक्त केली. यावेळी संघटनेच्या मावळत्या अध्यक्ष डॉ. उषा माहेश्वरी यांनी नवीन अध्यक्षांच्या हाती पुढील सूत्र हस्तांतरित केली. तसेच डॉ गणेश राठोड यांच्या सोबतच नवनिर्वाचित सचिव डॉ. सागर दडस, हिशोब तपासणीस डॉ प्रमोद बाळापुरे, सह हिशेब तपासणीस डॉ राहुल चौधरी, उपाध्यक्ष डॉ. सुभाष हांडे, डॉ श्रीकांत गर्जे, सहसचिव डॉ अझहर शेख, डॉ मनुषा कुलकर्णी, आदिंचीही निवड घोषित करण्यात आली.
याप्रसंगी, डॉ. गणेश राठोड यांना शुभेच्छा देण्यासाठी अंबरनाथ विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. बालाजी किणीकर, माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी, दैनिक अंबरनाथ संपादक कमलाकर सूर्यवंशी, स्री रोगतज्ञ डॉ अरुणा राठोड यांच्या सह शहरातील नामांकित डॉक्टर उपस्थित होते. यावेळी डॉ. गणेश राठोड यांचा सर्वांच्या साक्षीने सन्मान करण्यात आला सत्काराला उत्तर देतांना डॉ गणेश राठोड म्हणाले की, या अंबरनाथनं मला मोठं केलं. अंबरनाथ मेडिकल चॅरिटेबल असोसिएशनच्या माध्यमातून अनेक सामाजिक संघटनांना जोडून सामाजिक स्तर उंचावण्याचा मी प्रयत्न करीन. शहरातील जवळपास ४०० डॉक्टरांना एकत्रित करून एखाद्या कॉर्पोरेट हॉस्पिटल उभारण्याचा माझा मानस आहे ".

# मुरबाडमध्ये शिमगोत्सव उत्साहात साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड :मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्टा तसेच शहरी भागात गुरूवारी सायंकाळी ६.३०ते८.३० होळी पेटवण्याचा मुहूर्त असल्याने तालुक्यातील सर्व गावांमध्ये अगदी होळीचा शुभ मुहूर्त साधून सर्वत्र होळी पेटवण्यात आली.मुरबाड शहरातील गणेश नगर येथे माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांच्या हस्ते होळीची आरती,पुजा करून होळी पेटवण्यात आली तर माल्हेड येथे ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या हस्ते होळीला आरती करून नंतर होळी पेटवण्यात आली तर त्याच दरम्यान ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करून होळी सण साजरा करण्यात आला तसेच दुसऱ्या दिवशी शुक्रवारी धुलीवंदन असल्याने तालुक्यातील सर्वच ठिकाणी बालबच्चा कंपनीकडून ठीकठिकाणी रस्ते अडवून येणाऱ्या जाणाऱ्या नागरी कडून होळी सणाचा पोस्त मागत होते नाहीतर आम्ही तुमच्या अंगावर रंग टाकू असा हास्य करून या बालबच्चनच्या मार्फत धुलीवंदन ग्रामीण भागात साजरा केला तर मुरबाड शहरातील एमआयडीसीला सुट्टी असल्याने उत्तर भारतीय नागरिकांनी धुलीवंदनाचा चांगलाच आस्वाद घेतल्याचे चित्र दिसून आले.
ग्रामीण भागात रंगपंचमीला विशेष महत्त्व असतो असे बोलले जात आहे. कारण होळी सणाचा पाच दिवसानंतर रंगपंचमी येते. तर ग्रामीण भागात होळी सणाला शिमगा म्हटला जात आहे.अशी शिमगा म्हटल्याची पंरपरा आजही कायम ग्रामीण भागात आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. Chemistry Maths, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. Chemistry, M.Com. Advanced Accountancy, M.A. Marathi, M.A. History, M.A. Economics, M.A. Sociology, M.A. Geography, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024